भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

# कोळसा खाणी भविष्य निधि व संकीर्ण उपबंध अधिनियम, १९४८

(पूर्वीचा 'कोळसा खाणी भविष्य निधि, कुटुंब पेन्शन व बोनस योजना अधिनियम, १९४८')

(१९४८ चा अधिनियम क्रमांक ४६)

[१ मे, १९७९ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Coal Mines Provident Fund and Miscellaneous Provisions Act, 1948

**(Formerly known as the Coal Mines Provident Fund, Family Pension and Bonus Schemes Act, 1948)**

**(Act No. 46 of 1948)**

[*As in force on the 1st May, 1979*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले

१९८०

[किंमत ८० पैसे]

## विशोधन अधिनियम व अनुकूलन आदेश यांची सूची

१. 'निरसन व विशोधन अधिनियम, १९४९' (१९४९ चा ४०).

२. 'कोळसा खाणी भविष्य निधि व बोनस योजना (विशोधन) अधिनियम, १९५०' (१९५० चा ८०).

३. 'विधि अनुकूलन आदेश, १९५०'.

४. 'कोळसा खाणी भविष्य निधि व बोनस योजना (विशोधन) अधिनियम, १९५१' (१९५१ चा २१).

५. 'कोळसा खाणी भविष्य निधि व बोनस योजना (विशोधन) अधिनियम, १९६५' (१९६५ चा ४५).

६. 'केंद्रीय कामगार कायदे (जम्मू व काश्मीरवर विस्तारण) अधिनियम, १९७०' (१९७० चा ५१).

७. 'कामगार भविष्य निधि कायदे (विशोधन) अधिनियम, १९७१' (१९७१ चा १६).

८. 'कामगार भविष्य निधि कायदे (विशोधन) अधिनियम, १९७६' (१९७६ चा ९९).

# कोळसा खाणी भविष्य निधि व संकीर्ण उपबंध अधिनियम, १९४८

## कलमांचा क्रम

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. निर्वचन.

३. कोळसा खाणी भविष्य निधि योजना.

३क. विश्वस्त मंडळ घटित करणे.

३ख. विश्वस्त मंडळ हा निगम निकाय असणे.

३ग. अधिकाऱ्यांची नियुक्ती.

३घ. खातेबदल.

३ङ. कोळसा खाणी कुटुंब पेन्शन योजना.

३च. केंद्र शासनाकडून विशेष अनुदान.

३छ. कोळसा खाणी ठेव-संलग्न विमा योजना.

४. निधीला १९२२ चा अधिनियम ११ याखाली मान्यता देणे.

५. कोळसा खाणी बोनस योजना.

६. योजनेचा भूतलक्षी प्रभाव.

७. योजनेमध्ये फेरबदल करणे.

७क. योजना संसदेपुढे ठेवणे.

७ख. नियोक्त्यांकडून यावयाच्या पैशांच्या रकमा ठरवणे.

८. जप्तीपासून संरक्षण.

९. दंड.

१०. निरीक्षक.

१०क. नियोक्त्याकडून येणे असलेल्या पैशांची वसुली करण्याची पद्धत.

१०ख. विवक्षित प्रकरणी नियोक्त्यांची निश्चिती करणे.

१०ग. शक्तींचे प्रत्यायोजन.

१०घ. नियोक्त्यांनी अंशदान करणे आणि त्याची सदस्यांकडून वसुली करणे.

१०ङ. नियोक्ते आणि कंत्राटदार यांनी पैशांची वसुली करणे.

१०च. नुकसानी वसूल करण्याची शक्ती.

११. अंशदाने आणि बोनस यांच्या प्रदानास इतर ऋणांपेक्षा पूर्वता.

११क. सद्‌भावपूर्वक केलेल्या कृतींना संरक्षण.

११ख. अडचणी दूर करण्याची शक्ती.

११ग. सूट देण्याची शक्ती.

११घ. १९५६ चा अधिनियम ३१ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अधिनियम परिणामक असणे.

१२. १९४८ चा अध्यादेश ७ याचे निरसन.

पहिली अनुसूची.

दुसरी अनुसूची.

तिसरी अनुसूची.

चौथी अनुसूची.

# कोळसा खाणी भविष्य निधि व संकीर्ण उपबंध अधिनियम, १९४८

(१९४८ चा अधिनियम क्रमांक ४६)

[३ सप्टेंबर, १९४८]

कोळसा खाणींमध्ये कामाला लावलेल्या व्यक्तींकरिता भविष्य निधि योजना/[६][कुटुंब पेन्शन योजना] [७][, ठेव-संलग्न विमा योजना] व बोनस योजना तयार करण्याचा उपबंध करण्यासाठी अधिनियम.

[८]* * * *

याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

[९][१. (१) या अधिनियमास, 'कोळसा खाणी भविष्य निधि व संकीर्ण उपबंध अधिनियम, १९४८' असे म्हणता येईल.] संक्षिप्त नाव व विस्तार.

[१][(२) त्याचा विस्तार [५]* * * संपूर्ण भारतभर आहे.]

२. या अधिनियमामध्ये विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,— निर्वचन.

(क) "बोनस" याचा अर्थ, या अधिनियमाखाली तयार केलेल्या कोळसा खाणी बोनस योजनेखाली [२][कामगाराला] प्रदेय असलेली कोणतीही पैशांची रक्कम असा आहे;

[३][(कक) "कोळसा" यामध्ये लिग्नाईटचा समावेश आहे;]

[४][(ख) "कोळसा खाण" याचा अर्थ, ज्या ठिकाणी कोळसा शोधण्याच्या किंवा मिळवण्याच्या प्रयोजनार्थ कोणतेही काम चालवण्यात येत होते किंवा येत आहे असे कोणतेही खोदकाम असा आहे आणि त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे—

(एक) सर्व पोखरून काढलेले कपळे आणि विवरे;

(दोन) कोळसा खाणीतील किंवा नजीकचे आणि तिच्या मालकीचे सर्व कूपक— मग त्यांचे खोदकाम चालू असो वा नसो—;

(तीन) खणले जात असतानाच्या अवस्थेतील सर्व समतल आणि तिरपे बोगदे;

(चार) कोणताही मैदानी खाणखळगा किंवा दगडखाण म्हणजे, ज्या ठिकाणी कोळसा शोधण्याच्या किंवा मिळवण्याच्या प्रयोजनार्थ कोणतेही काम चालवण्यात येत होते किंवा येत आहे असे खोदकाम—पण कूपक किंवा वरजमिनीखाली जाणारे खोदकाम नव्हे;

(पाच) कोळसा खाणीमध्ये कोळसा किंवा इतर वस्तू आणण्याकरिता किंवा तेथून नेण्याकरिता अथवा तेथून कचरा नेण्याकरिता ठेवलेली सर्व वहनसाधने किंवा अधांतरी रज्जुमार्ग;

(सहा) कोळसा खाणीतील किंवा नजीकचे आणि तिच्या मालकीचे सर्व आरोक, समतल बोगदे, तिरपे बोगदे, यंत्रसामग्री, बांधकामे, रेल्वेमार्ग, ट्रामभार्ग आणि कडरूळ ;

(सात) एखाद्या कोळसा खाणीच्या प्रसीमांमध्ये असणाऱ्या व एकाच व्यवस्थापनाखाली असणाऱ्या आणि त्याच कोळसा खाणीच्या किंवा त्याच व्यवस्थापनाखालील अनेक कोळसा खाणींच्या संबंधातील प्रयोजनांकरता वापरल्या जाणाऱ्या सर्व कार्यशाळा;

(आठ) कोळसा खाणीचे कोणतेही कार्यालय;

---

१. 'अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे मूळ पोटकलम (२) ऐवजी घातले.

२. १९५० चा अधिनियम ८०–कलम ३ द्वारे "कोळसा खाणीमधील कामगार" याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

३. १९६५ चा अधिनियम ४५–कलम २ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

४. कित्ता—कलम २ द्वारे मूळ खंड (ख) ऐवजी घातले (१ एप्रिल १९६६ रोजी व तेव्हापासून).

५. १९७० चा अधिनियम ५१–कलम २ व अनुसूची यांद्वारे "जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून" हे शब्द गाळले (१ सप्टेंबर, १९७१ रोजी व तेव्हापासून).

६. १९७१ चा अधिनियम १६–कलम २ द्वारे घातले (१३ फेब्रुवारी, १९७१ रोजी व तेव्हापासून).

७. १९७६ चा अधिनियम ९९–कलम २ द्वारे घातले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

८. कित्ता—कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

९. कित्ता—कलम ३ द्वारे परिच्छेद गाळला (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

(नऊ) ती कोळसा खाण किंवा त्याच व्यवस्थापनाखालील अनेक कोळसा खाणी चालवण्यासाठी वीजपुरवठा करणारी सर्व वीज केंद्रे;

(दहा) जी वास्तू सर्वस्वी कोळसा खाणीच्या नियोक्त्याच्या वहिवाटीत असून, त्या त्या वेळी कोळसा खाणीतील कचरा साठवण्यासाठी वापरली जात असेल, अथवा जेथे अशा कचऱ्याच्या संबंधात कोणतीही क्रिया केली जाते अशी कोणतीही वास्तू;

(अकरा) एखाद्या कोळसा खाणीमधील अथवा एकाच व्यवस्थापनाखालील अनेक कोळसा खाणींमधील कामगारांच्या फायद्यासाठी चालवण्यात येणारी सर्व आहारगृहे व इस्पितळे;

(बारा) कोणतीही कोकची भट्टी किंवा संयंत्र;

(तेरा) जेथे कोळसा खाणीशी संबंधित असे कोणतेही संयंत्र किंवा इतर यंत्रसामग्री असेल किंवा जेथे कोळसा खाणीतील कामाला साहाय्यभूत अशी कोणतीही प्रक्रिया केली जाते अशी कोळसा खाणीतील किंवा नजीकची आणि तिच्या मालकीची कोणतीही वास्तू; ]

(ग) "अंशदान" याचा अर्थ, या अधिनियमाखाली तयार करण्यात आलेल्या कोळसा खाणी भविष्य निधि योजनेअन्वये एखाद्या सदस्याच्या संबंधात द्यावयाचे अंशदान [किंवा, ज्याला विमा योजना लागू होते अशा कामगाराच्या संबंधात द्यावयाचे अंशदान] असा आहे;

[१][(घ) "कामगार" याचा अर्थ, जी व्यक्ती कोळसा खाणीत किंवा तिच्या संबंधात कोणत्याही प्रकारचे अंगमेहनतीचे किंवा इतर काम करण्यासाठी मजुरीवर नेमलेली असून जिला तिचे वेतन प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे तिच्या नियोक्त्याकडून मिळते अशी कोणतीही व्यक्ती असा आहे, आणि त्यामध्ये —

(१) एखाद्या कंत्राटदाराने किंवा त्याच्यामार्फत कोळसा खाणीत किंवा तिच्या संबंधात कामावर नेमलेली कोणतीही व्यक्ती, आणि

(२) तसेच कोळसा खाणी भविष्य निधि योजनेच्या प्रयोजनार्थ,—

(एक) सफाई कामगार, माळी, शिक्षक किंवा घरगडी म्हणून ज्या व्यक्तीची कोळसा खाणीमध्ये किंवा तिच्या संबंधात कामावर नेमणूक झालेली असून जिला प्रत्यक्षपणे नियोक्त्याकडून वेतन मिळते अशी अन्य कोणतीही व्यक्ती, आणि

(दोन) नियोक्त्याकडून ज्याला वृत्तिवेतन किंवा इतर पारिश्रमिक मिळते असा कोणताही शिकाऊ उमेदवार किंवा प्रशिक्षार्थी हेसुद्धा

समाविष्ट आहेत;]

[२][(ङ) "नियोक्ता" हा शब्द कोळसा खाणीच्या संबंधात वापरला असता त्याचा अर्थ, जी व्यक्ती कोळसा खाणीचा किंवा तिच्या एखाद्या भागाचा प्रत्यक्ष मालक किंवा पट्टेदार किंवा कार्यचालक आहे अशी कोणतीही व्यक्ती आणि समापक किंवा प्रापक हे जिचा कारभार पहात आहेत अशा कोळसा खाणीच्या बाबतीत असा समापक किंवा प्रापक आणि जेव्हा कोळसा खाण एखाद्या कंपनीच्या मालकीची असून व्यवस्थापन एजंट तिचा कारभार पहात असेल तेव्हा तो व्यवस्थापन एजंट असा आहे; परंतु ज्या व्यक्तीला कोळसा खाणीकडून नुसते स्वामित्वधन, भाडे किंवा नजराणा मिळतो ती व्यक्ती किंवा खाण चालवण्यासाठी दिलेला भाडेपट्टा, अनुदान किंवा लायसन यांच्या अधीनतेने जी व्यक्ती नुसती कोळसा खाणीची मालक आहे, किंवा जी व्यक्ती कोळसा खाणीच्या जमिनीची नुसती मालक असून तेथील कोळशामध्ये हितसंबंधित नाही—अशी व्यक्ती यात समाविष्ट नाही; परंतु कोळसा खाणीत किंवा तिच्या काही भागात खाणकाम करण्यासाठी नेमलेला कोणताही कंत्राटदार हा जणू काही नियोक्ता असावा त्याप्रमाणे तो अधिनियमास अधीन होईल, पण त्यामुळे नियोक्त्याला कोणत्याही दायित्वापासून सूट मिळणार नाही;]

[४][(ङङ) "कुटुंब पेन्शन निधि" याचा अर्थ, कलम ३ङच्या पोटकलम (१) खाली तयार करण्यात आलेल्या 'कोळसा खाणी कुटुंब पेन्शन योजने' खाली स्थापन करण्यात आलेला कुटुंब पेन्शन निधी असा आहे;]

(च) "निधि" याचा अर्थ, 'कोळसा खाणी भविष्य निधि योजने' खाली स्थापन करण्यात आलेला भविष्य निधी असा आहे; [३]* * *

---

१. १९६५ चा अधिनियम ४५–कलम २ द्वारे मूळ खंड (घ) ऐवजी घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम २ द्वारे मूळ खंड (ङ) ऐवजी घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता—कलम २ द्वारे "आणि" हा शब्द गाळला (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

४. १९७१ चा अधिनियम १६–कलम ५ द्वारे घातले (१३ फेब्रुवारी, १९७१ रोजी व तेव्हापासून).

५. १९७६ चा अधिनियम ९९–कलम ४ द्वारे घातले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[१][(चक्) "विमा निधि" याचा अर्थ, कलम ३छ-पोटकलम (२) खाली स्थापन करण्यात आलेला "ठेव-संलग्न विमा निधि" असा आहे ;

(चख्) "विमा योजना" याचा अर्थ, कलम ३छ-पोटकलम (१) खाली तयार करण्यात आलेली "कोळसा खाणी ठेव-संलग्न विमा योजना" असा आहे ;]

[२][ [६][(चग्)] "व्यवस्थापन एजंट" याला 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १) यामध्ये त्यास नेमून देण्यात आलेला अर्थ आहे ; आणि]

(छ) "सदस्य" याचा अर्थ, निधीचा सदस्य असा आहे.

३. (१) [१][कामगारांसाठी] भविष्य निधी स्थापन करण्याकरता केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे 'कोळसा खाणी भविष्य निधि योजना' या नावाची योजना तयार करून उक्त योजना कोणत्या कोळसा खाणींना लागू होईल ते विनिर्दिष्ट करू शकेल. **कोळसा खाणी भविष्य निधि योजना.**

[३][(१क) हा निधी कलम ३क खाली घटित झालेल्या मंडळाकडे निहित होईल आणि ते त्याचे प्रशासन करील.]

(२) पोटकलम (१) च्या उपबंधांखाली तयार करण्यात आलेल्या कोणत्याही योजनेद्वारे, पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसंबंधी उपबंध करता येईल.

[४][३क. (१) ज्या राज्यक्षेत्रांना हा अधिनियम लागू आहे त्यांच्याकरता केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्यात विनिर्दिष्ट असेल अशा दिनांकापासून एक विश्वस्त मंडळ (या अधिनियमामध्ये यापुढे 'मंडळ' म्हणून निर्दिष्ट केलेले) घटित करू शकेल व ते पुढील व्यक्तींचे मिळून बनलेले असेल, त्या अशा :— **[४][विश्वस्त मंडळ घटित करणे.]**

(क्) केंद्र शासनाने नियुक्त केलेला अध्यक्ष;

(ख्) आयुक्त, कोळसा खाणी भविष्य निधि—पदसिद्ध;

(ग्) केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या तीन व्यक्ती;

(घ्) केंद्र शासन या संबंधात वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा राज्यांच्या शासनांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या अशा जास्तीत जास्त सहा व्यक्ती;

(ङ्) केंद्र शासनाने या संबंधात मान्यता दिलेल्या असतील अशा नियोक्ता संघटनांशी विचारविनिमय करून नंतर केंद्र शासनाने नियोक्त्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नियुक्त केलेल्या सहा व्यक्ती—त्यांपैकी निदान एक तरी व्यक्ती अशी असेल की, जी अशा कोणत्याही संघटनेची सदस्य नाही;

(च्) केंद्र शासनाने या संबंधात मान्यता दिलेल्या असतील अशा कामगार-संघटनांशी विचारविनिमय करून नंतर केंद्र शासनाने कामगारांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नियुक्त केलेल्या सहा व्यक्ती—त्यांपैकी निदान एकतरी व्यक्ती स्वतः कामगार असेल आणि निदान एकतरी व्यक्ती अशी असेल की, जी अशा कोणत्याही संघटनेची सदस्य नाही.

(२) ज्यांच्या अधीनतेने मंडळाच्या सदस्याची नियुक्ती करता येईल त्या अटी व शर्ती आणि मंडळाच्या बैठकींची वेळ, स्थळ आणि कार्यपद्धती ही "कोळसा खाणी भविष्य निधी योजने"त उपबंध करण्यात आल्याप्रमाणे राहील.

(३) [५][कलम ३ङच्या [७][व कलम ३छच्या] उपबंधांच्या अधीनतेने,] मंडळ हे त्याच्याकडे निहित असलेल्या निधीचे प्रशासन पूर्वोक्त योजनेमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे चालवील.

---

१. १९५० चा अधिनियम ८०—कलम ४ द्वारे 'कोळसा खाणीमधील कामगार' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

२. १९६५ चा अधिनियम ४५—कलम २ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता—कलम ३ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

४. कित्ता—कलम ४ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

५. १९७१ चा अधिनियम १६—कलम ६ द्वारे घातले (१३ फेब्रुवारी, १९७१ रोजी व तेव्हापासून).

६. १९७६ चा अधिनियम ९९—कलम ४ द्वारे घातले व खंड (चच्) याला खंड (चग्) असा नवीन क्रमांक दिला (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

७. कित्ता—कलम ५ द्वारे घातले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

(४) [1][ 'कोळसा खाणी भविष्य निधि योजना' [2][, 'कोळसा खाणी कुटुंब पेन्शन योजना' व 'विमा योजना']] यांच्या कोणत्याही उपबंधांनुसार किंवा त्यांखाली मंडळाने करणे आवश्यक असतील अशी इतर कार्ये मंडळ करील.

विश्वस्त मंडळ हा निगम निकाय असणे.

३ख. कलम ३क खाली घटित करण्यात आलेले विश्वस्त मंडळ म्हणजे ते घटित करणाऱ्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नावाचा व उत्तराधिकाराची निरंतर परंपरा आणि सर्वसामान्य मोहोर असलेला निगमनिकाय असेल आणि उक्त नावाने त्याच्याकडून व त्याच्याविरुद्ध दावा लावण्यात येईल.

अधिकाऱ्यांची नियुक्ती.

३ग. (१) केंद्र शासनाकडून आयुक्त, कोळसा खाणी भविष्य निधि याची नियुक्ती करण्यात येईल. व तो मंडळाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असेल आणि तो मंडळाच्या सर्वसाधारण नियंत्रणास आणि अधीक्षणास अधीन असेल.

(२) आयुक्त, कोळसा खाणी भविष्य निधि याला त्याची कर्तव्ये पार पाडण्याच्या कामी साहाय्य करण्यासाठी केंद्र शासनाला आवश्यक वाटतील तितके व ज्यांचे किमान मासिक वेतन त्यांना लागू असलेल्या वेतनश्रेणीनुसार (लागू असल्यास) कमीत कमी चारशे रुपये आहे असे इतर अधिकारीही केंद्र शासनाला नियुक्त करता येतील.

(३) पोटकलमे (१) आणि (२) यांच्या उपबंधांच्या अधीनतेने, मंडळाला 'कोळसा खाणी भविष्य निधि योजना' [4][ 'कोळसा खाणी कुटुंब पेन्शन योजना' व 'विमा योजना'] यांचे प्रशासन कार्यक्षमपणे चालण्यासाठी त्याला आवश्यक वाटतील असे इतर अधिकारी आणि कर्मचारी नियुक्त करता येतील.

(४) आयुक्त, कोळसा खाणी भविष्य निधि याची जागा भरण्याची पद्धती, त्याचा पगार आणि भत्ते, शिस्त पालन आणि इतर सेवा-शर्ती या केंद्र शासनाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील आणि असा पगार व भत्ते हे या निधीतून दिले जातील.

(५) मंडळाच्या इतर अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या जागा भरण्याची पद्धती, पगार आणि भत्ते, शिस्त व इतर सेवा-शर्ती या मंडळाने केंद्र शासनाच्या मान्यतेने निश्चित केल्याप्रमाणे असतील.

खातेबदल.

३घ. (१) जेव्हा एखादा कामगार, तो ज्या कोळसा खाणीत कामाला असेल तिच्या भविष्य निधीचा वर्गणीदार असताना, तो कोणत्याही 'कोळसा खाणी भविष्य निधि योजने' च्या उपबंधांनुसार त्या निधीचा सदस्य झाला तर, कोळसा खाणीच्या भविष्य निधीमध्ये कामगाराच्या खाती संचित झालेल्या रकमा, त्या त्या काळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात, भविष्य निधी स्थापन करणाऱ्या कोणत्याही विलेखात किंवा अन्य संलेखात विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, मात्र योजनेमध्ये काही उपबंध अंतर्भूत असल्यास त्यांच्या अधीनतेने, योजनेतील उपबंधांद्वारे ठरवली असेल अशा व्यक्तीकरवी व अशा अवधीत या निधीकडे बदली केल्या जातील, आणि या निधीमध्ये असलेल्या त्या कामगाराच्या खात्यात जमा केल्या जातील.

(२) जर निधीच्या एखाद्या सदस्याने कोळसा खाणीतील आपली नोकरी सोडली आणि त्याला (कोळसा खाणी भविष्य निधि योजना लागू असलेली कोळसा खाण वगळून) दुसऱ्या एखाद्या आस्थापनेकडे मागाहून नोकरी मिळाली आणि तो त्या आस्थापनेच्या एखाद्या भविष्य निधीचा वर्गणीदार बनला तर, अशा कामगाराच्या खाती संचित झालेली रक्कम, त्या कामगाराची तशी इच्छा असल्यास आणि त्या भविष्य निधीसंबंधीच्या नियमांनुसार खातेबदल अनुज्ञेय असल्यास, याबाबत केंद्र शासनाने निश्चित केले असेल एवढ्या अवधीत, तो ज्या दुसऱ्या आस्थापनेकडे नोकरीस लागला असेल तेथील भविष्य निधीमध्ये असलेल्या त्याच्या खात्याकडे बदली करून जमेस टाकण्यात येईल.

(३) जर (कोळसा खाणी भविष्य निधि योजना लागू असलेली कोळसा खाण वगळून) एखाद्या आस्थापनेच्या भविष्य निधीचा वर्गणीदार असलेल्या एखाद्या कामगाराने त्या आस्थापनेतील आपली नोकरी सोडली आणि त्याला एखाद्या कोळसा खाणीत दुसरी नोकरी मिळाली आणि तो निधीचा सदस्य बनला तर, त्याने सोडलेल्या आस्थापनेच्या भविष्य निधीमध्ये त्याच्या जमेस संचित झालेली रक्कम, त्या कामगाराची तशी इच्छा असल्यास आणि अशा भविष्य निधीसंबंधीच्या नियमांनुसार खातेबदल अनुज्ञेय असल्यास, या निधीमध्ये असलेल्या त्याच्या खात्याकडे बदली करून जमेस टाकण्यात येईल.]

[3][कोळसाखाणी कुटुंब पेन्शन योजना.]

[3][३ङ. (१) 'कोळसा खाणी भविष्य निधि योजने' च्या कक्षेत येणाऱ्या अशा कामगारांना कुटुंब पेन्शन आणि आयुर्विमा हे लाभ देण्यासाठी केंद्र शासनाला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे 'कोळसा खाणी कुटुंब पेन्शन योजना' या नावाची योजना तयार करता येईल.

---

१. १९७१ चा अधिनियम १६–कलम ६ द्वारे "उपरोक्त योजना" या शब्दांऐवजी घातले (१३ फेब्रुवारी, १९७१ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम ८ द्वारे घातले (१३ फेब्रुवारी, १९७१ रोजी व तेव्हापासून).

३. १९७६ चा अधिनियम ९९–कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

४. १९७१ चा अधिनियम १६–कलम ७ द्वारे "आणि कोळसा खाणी कुटुंब पेन्शन योजना" हा मजकूर घातला होता, त्याऐवजी १९७६ चा अधिनियम ९९–कलम ६ द्वारे हा मजकूर घातला (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

(२) पूर्वोक्त योजना तयार केल्यानंतर होईल तितक्या लवकर 'कुटुंब पेन्शन निधि' स्थापन करण्यात येईल, आणि त्यात वेळोवेळी अशा प्रत्येक कामगाराच्या संबंधात पुढीलप्रमाणे भरणा करण्यात येईल :—

(क्) नियोक्त्याचे अंशदान व कामगाराचे अंशदान म्हणून कलम १०घ-पोटकलम (१) खाली प्रदेय असलेल्या रकमेपैकी उक्त योजनेत विनिर्दिष्ट असेल असा जास्तीत जास्त एक-चतुर्थांशा-इतका अंश, आणि

(ख्) कलम १०घ-पोटकलम (१) खाली नियोक्त्याच्या अंशदानामधून खंड (क्) अनुसार प्रदेय असलेली रक्कम आणि अशा कामगारासंबंधी त्या पोटकलमाखाली नियोक्त्याच्या अंशदानाच्या एक-सोळांशाइतकी रक्कम मिळून होणाऱ्या एकवट रकमेपेक्षा कमी नाहीत अशा ज्या रकमा संसदेने यासंबंधी कायद्याद्वारे यथायोग्य विनियोजन केल्यानंतर केंद्र शासन विनिर्दिष्ट करील त्या रकमा.

(३) कुटुंब पेन्शन निधी हा मंडळाकडे निहित असेल आणि मंडळ त्याचे प्रशासन करील.

(४) पोटकलम (१) च्या उपबंधांखाली तयार करण्यात आलेल्या कोणत्याही योजनेद्वारे दुसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसंबंधी उपबंध करता येईल.

**केंद्र शासनाकडून विशेष अनुदान.**

**३च.** याबाबत संसदेने कायद्याद्वारे यथायोग्य विनियोजन केल्यानंतर, केंद्र शासन 'कोळसा खाणी कुटुंब पेन्शन योजने' अन्वये किंवा तिच्या खाली उपबंधित करण्यात आलेल्या कोणत्याही लाभाच्या किंमतीपोटी करावा लागणारा खर्च सोडून, त्या योजनेच्या प्रशासनासंबंधात येणारा सर्व खर्च भागधण्यासाठी, स्वत: ठरवील त्याप्रमाणे अशा आणखी रकमांचा कुटुंब पेन्शन निधीमध्ये भरणा करील. ]

**[1][ कोळसा खाणी ठेव-संलग्न विमा योजना. ]**

[1][ **३छ.** (१) केंद्र शासन 'कोळसा खाणी भविष्य निधि योजने' खाली येणाऱ्या अशा कामगारांना आयुर्विम्याचे फायदे उपलब्ध करून देण्याच्या प्रयोजनार्थ, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे 'कोळसा खाणी ठेव-संलग्न विमा योजना' या नावाने संबोधावयाची एक योजना तयार करू शकेल.

(२) विमा योजना तयार करण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, एक ठेव-संलग्न विमा निधी स्थापन करण्यात येईल व त्यात नियोक्त्याला, तो ज्याच्या संबंधात नियोक्ता असेल अशा प्रत्येक कामगाराच्या बाबतीत, त्या त्या वेळी अशा कामगाराच्या संबंधात प्रदेय असे मूळ वेतन, महागाई भत्ता व आरक्षण भत्ता (काही असल्यास) मिळून होणाऱ्या एकवट रकमेच्या एक टक्क्यापेक्षा अधिक नसेल अशी जेवढी रक्कम केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील तेवढ्या रकमेचा वेळोवेळी भरणा करावा लागेल.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क्) "मूळ वेतन" या शब्दप्रयोगास 'कर्मचारी भविष्य निधि व संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५२' (१९५२ चा १९) यामध्ये नेमून दिल्याप्रमाणे तोच अर्थ आहे ;

(ख्) "महागाई भत्ता" याचा अर्थ, राहणीखर्चामध्ये वाढ झाल्यामुळे कामगारास करण्यात येणारी सर्व रोख प्रदाने असा आहे—मग ती कोणत्याही नावाने संबोधली जावोत—व त्यामध्ये कामगाराला दिल्या जाणाऱ्या कोणत्याही भोजनविषयक सवलतीच्या रोख मूल्याचादेखील समावेश होतो असे मानण्यात येईल ;

(ग्) "आरक्षण भत्ता" याचा अर्थ, कोणतीही कोळसा खाण ज्या कोणत्याही कालावधीमध्ये चालू नसेल त्या कालावधीमध्ये एखाद्या कामगाराच्या सेवा आरक्षित करण्यासाठी त्याला त्या त्या वेळी द्यावयाचा भत्ता असा आहे.

(३) संसदेने कायद्याद्वारे यथायोग्य विनियोजन केल्यानंतर, केंद्र शासन 'कोळसा खाणी भविष्य-निधि योजने' खाली येणाऱ्या प्रत्येक कामगाराच्या संबंधात विमा निधीमध्ये, पोटकलम (२) अनुसार नियोक्त्याने जे अंशदान करणे आवश्यक असते त्याच्या निम्म्याइतक्या रकमेचे अंशदान देईल.

(४) (क्) विमा योजनेद्वारे किंवा त्या योजनेखाली पुरवण्यात आलेल्या कोणत्याही लाभांच्या परिव्ययासंबंधीचा खर्च वगळता त्या योजनेच्या प्रशासनाच्या संबंधातील अन्य सर्व खर्च भागविण्यासाठी नियोक्त्याला विमा निधीमध्ये, पोटकलम (२) खाली त्याने जितके अंशदान करणे आवश्यक असेल त्याच्या एक-चतुर्थांशापेक्षा जास्त नसतील अशा आणखी ज्या रकमा केंद्र शासन वेळोवेळी ठरवून देईल त्यांचा भरणा करावा लागेल.

(ख्) संसदेने कायद्याद्वारे यथायोग्य विनियोजन केल्यानंतर, केंद्र शासन विमा योजनेद्वारे किंवा त्या योजनेखाली पुरवण्यात येणाऱ्या कोणत्याही लाभांच्या परिव्ययासंबंधीचा खर्च वगळता त्या योजनेच्या प्रशासनाच्या संबंधातील अन्य सर्व खर्च भागविण्यासाठी विमा निधीमध्ये, खंड (क्) खाली नियोक्त्याने द्यावयाच्या रकमांच्या निम्म्याइतक्या असणाऱ्या अशा आणखी रकमांचा भरणा करील.

(५) विमा निधी हा मंडळाकडे निहित होईल व विमा योजनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने मंडळ त्याचे प्रशासन करील.

(६) पोटकलम (१) च्या उपबंधांखाली तयार केलेल्या कोणत्याही योजनेद्वारे, तिसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही बाबींसंबंधी उपबंध करता येईल.]

---

१. **१९७६ चा अधिनियम ९९-कलम ७ द्वारे घातले** (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

निधीला १९२२ चा अधिनियम ११ याखाली मान्यता देणे.

४. 'भारतीय प्राप्तिकर अधिनियम, १९२२' [1][१९२२ चा ११] याच्या प्रयोजनार्थ, त्या अधिनियमाच्या प्रकरण ९ वे-क यामध्ये अभिप्रेत असल्याप्रमाणे हा निधी मान्यताप्राप्त भविष्य निधी असल्याचे मानण्यात येईल.

कोळसा खाणी बोनस योजना.

५. (१) शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे केंद्र शासन, [2][कामगारांना] बोनस देण्यासाठी 'कोळसा खाणी बोनस योजना' या नावाची एक योजना तयार करील आणि उक्त योजना कोणत्या कोळसा खाणींना लागू होणार ते विनिर्दिष्ट करील.

(२) पोटकलम (१) च्या उपबंधांखाली तयार करण्यात आलेल्या योजनेद्वारे, [3][चौथ्या अनुसूचीमध्ये] विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसंबंधी उपबंध करता येईल.

[4][(३) नियोक्ता पूर्वोक्ताप्रमाणे या योजनेनुसार बोनस देईल.]

योजनेचा भूतलक्षी प्रभाव.

६. या अधिनियमाखाली तयार करण्यात आलेल्या योजनेद्वारे असा उपबंध करता येईल की, त्या योजनेतील कोणतेही उपबंध त्या योजनेमध्ये या संबंधात विनिर्दिष्ट केला असेल अशा दिनांकापासून भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने अंमलात येतील.

योजनेमध्ये फेरबदल करणे.

७. शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे केंद्र शासनाला या अधिनियमाखाली तयार करण्यात आलेल्या योजनेमध्ये [5][भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने] भर घालता येईल, विशोधन करता येईल किंवा फेरबदल करता येईल.

[5][योजना संसदेपुढे ठेवणे.]

[5][७क. या अधिनियमाखाली तयार केलेली प्रत्येक योजना, ती तयार करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एक सत्राने किंवा [6][दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या एकूण तीस दिवसांच्या कालावधीत सत्रासीन असताना ठेवण्यात येईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर,] त्या योजनेमध्ये काही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा ती योजना करू नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर ती योजना अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या योजनेखाली केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.]

[6][नियोक्त्यांकडून यावयाच्या पैशांच्या रकमा ठरवणे.]

[6][७ख. (१) आयुक्त, कोळसा खाणी भविष्य निधि किंवा केंद्र शासनाने या संबंधात रीतसर प्राधिकृत केलेला अन्य कोणीतरी अधिकारी या अधिनियमाच्या किंवा त्याखाली तयार करण्यात आलेल्या कोणत्याही योजनेच्या कोणत्याही उपबंधान्वये कोणत्याही नियोक्त्याकडून येणे असलेली रक्कम आदेशाद्वारे निश्चित करू शकेल आणि या प्रयोजनार्थ त्याला आवश्यक वाटेल अशी चौकशी करू शकेल.

(२) पोटकलम (१) खाली चौकशीचे काम चालवणाऱ्या अधिकाऱ्याला अशा चौकशीच्या प्रयोजनार्थ, पुढील बाबतींत 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याखाली न्यायालयाकडे दाव्याची संपरीक्षा करण्यासाठी निहित केलेल्या शक्ती असतील, त्या अशा—

(क) कोणत्याही व्यक्तीला उपस्थित राहण्यास भाग पाडणे किंवा तिची शपथेवर तपासणी करणे;

(ख) दस्तऐवज प्रकट करण्यास व हजर करण्यास फर्मावणे;

(ग) प्रतिज्ञालेखाद्वारे पुरावा स्वीकारणे;

(घ) साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे;

आणि अशी कोणतीही चौकशी 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)-कलमे १९३ व २२८ यांच्या अर्थानुसार आणि कलम १९६ च्या प्रयोजनार्थ न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

(३) कोणत्याही नियोक्त्याला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, त्या नियोक्त्याकडून येणे असलेली रक्कम निश्चित करणारा कोणताही आदेश पोटकलम (१) खाली काढण्यात येणार नाही.

(४) या कलमाखाली देण्यात आलेला आदेश अंतिम असेल आणि कोणत्याही न्यायालयात तो प्रश्नास्पद करता येणार नाही.]

---

१. आता पहा, 'प्राप्तिकर अधिनियम, १९६१' (१९६१ चा ४३).

२. १९५० चा अधिनियम ८०—कलम ४ द्वारे 'कोळसा खाणीतील कामगार' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

३. १९७१ चा अधिनियम १६—कलम ९ द्वारे "दुसऱ्या अनुसूचीमध्ये" याऐवजी घालण्यात आलेल्या "तिसऱ्या अनुसूचीमध्ये" या शब्दांऐवजी १९७६ चा अधिनियम ९९-कलम ८ द्वारे वरील शब्द घातले.

४. १९६५ चा अधिनियम ४५—कलम ५ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

५. कित्ता—कलम ६द्वारे घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

६. १९७६ चा अधिनियम ९९-कलम ९ द्वारे घातले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

७. कित्ता—कलम १० द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

८. (१) निधीमध्ये कोणत्याही सदस्याच्या खाती जमा असलेली भविष्य निधीची रक्कम कोणत्याही प्रकारे अभिहस्तांकित किंवा प्रभारित करता येणार नाही आणि सदस्याने केलेल्या ऋणाच्या किंवा दायित्वाच्या संबंधात कोणत्याही न्यायालयाने काढलेल्या कोणत्याही हुकूमनाम्याखाली किंवा आदेशाखाली ती जप्तीला पात्र असणार नाही आणि 'प्रांतीय दिवाळखोरी अधिनियम, १९२०' (१९२० चा ५) याखाली नियुक्त केलेला पदस्थ अभिहस्तांकिती, तसेच कोणताही प्रापक अशा कोणत्याही रकमेस हक्कदार असणार नाही, किंवा त्या रकमेबाबत त्याला कोणताही मागणीहक्क असणार नाही. जप्तीपासून संरक्षण.

(२) कोणत्याही सदस्याच्या मृत्युसमयी निधीमध्ये त्याच्या खाती जमा असलेली आणि 'कोळसा खाणी भविष्य निधी योजने' खाली त्याच्या नामनिर्देशितीला द्यावयाची कोणतीही रक्कम, उक्त योजनेअन्वये वजात म्हणून प्राधिकृत केलेली रक्कम वजा जाऊन, नामनिर्देशित व्यक्तीमध्ये निहित होईल आणि मयत सदस्याने केलेले किंवा नामनिर्देशित व्यक्तीने सदस्याच्या मृत्यूपूर्वी केलेले कोणतेही ऋण किंवा अन्य दायित्व यांपासून ती रक्कम मुक्त असेल.

[५][(३) पोटकलम (१) व पोटकलम (२) यांचे उपबंध निधीतून द्यावयाच्या कोणत्याही रकमेच्या संबंधात जसे लागू होतात तसे ते 'कोळसा खाणी कुटुंब पेन्शन योजने' खाली द्यावयाचे कुटुंब पेन्शन किंवा अन्य कोणतीही रक्कम यांच्या संबंधात, [६][आणि विमा योजनेखाली प्रदेय असलेल्या कोणत्याही रकमेच्या संबंधातदेखील] शक्य तेथवर लागू होईल.]

९. [१][(१) जर एखादी व्यक्ती— दंड.

(क) या अधिनियमाच्या किंवा त्याअन्वये तयार केलेल्या कोणत्याही योजनेच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करील तर, ती सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल;

(ख) पूर्वोक्ताप्रमाणे शिक्षापात्र अशा कोणत्याही गुन्ह्याबद्दल दोषी ठरविण्यात आलेली असताना, आधीच्या दोषसिद्धीपासून दोन वर्षांच्या कालावधीत अशा कोणत्याही गुन्ह्याबद्दल पुन्हा दोषी ठरली तर, दोषसिद्धीअंती ती एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.]

(२) [२][पोटकलम (१) खाली] शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही गुन्ह्याबाबत, केंद्र शासनाने त्या-संबंधात विनिर्दिष्ट केले असेल अशा प्राधिकरणाच्या पूर्वमंजुरीनिशी निरीक्षकाने अशा गुन्ह्याच्या घटकतथ्यांचा लेखी अहवाल दिल्याखेरीज, कोणतेही न्यायालय दखल घेणार नाही.

[३][(३) इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी याच्या न्यायालयाहून कनिष्ठ असलेले कोणतेही न्यायालय पोटकलम (१) खाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही गुन्ह्याची संपरीक्षा करणार नाही.]

१०. (१) केंद्र शासनाला स्वतःस कोळसा खाणी भविष्य निधि योजनेच्या [७][किंवा विमा योजनेच्या] किंवा कोळसा खाणी बोनस योजनेच्या प्रयोजनांसाठी, निरीक्षक म्हणून योग्य वाटतील अशा व्यक्ती **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्त करता येतील आणि त्यांची अधिकारिता निश्चित करता येईल. निरीक्षक.

(२) आपल्या अधिकारितेतील कोणत्याही कोळसा खाणीच्या संबंधात निरीक्षक, —

[४][(क) नियोक्त्याला किंवा कलम १०ङ खाली ज्याच्याकडून कोणतीही रक्कम वसूल करावयाची असेल अशा कोणत्याही कंत्राटदाराला, या अधिनियमाखाली तयार केलेल्या कोणत्याही योजनेच्या प्रयोजनासाठी निरीक्षकाला आवश्यक वाटेल ती कोळसा खाणीतील व्यक्तींच्या सेवायोजनाशी संबंधित—

(एक) अशी माहिती सादर करण्यास, किंवा

(दोन) असे हिशेब, पुस्तके, नोंदवह्या किंवा इतर दस्तऐवज निरीक्षकाच्या कार्यालयात अथवा नियोक्त्याला किंवा, प्रकरणपरत्वे, कंत्राटदाराला अधिक जवळ असेल अशा अन्य कोणत्याही ठिकाणी हजर करण्यास

फर्मावू शकेल; ]

---

१. १९६५ चा अधिनियम ४५-कलम ७ द्वारे मूळ पोट-कलम (१) ऐवजी घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम ७ द्वारे "अशा कोणत्याही योजनेखाली" याऐवजी घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता—कलम ७ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

४. कित्ता—कलम ८ द्वारे मूळ खंड (क) ऐवजी घातले—(१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

५. १९७१ चा अधिनियम १६-कलम १० द्वारे घातले (१३ फेब्रुवारी, १९७१ रोजी व तेव्हापासून).

६. १९७६ चा अधिनियम ९९-कलम ११ द्वारे घातले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

७. कित्ता—कलम १२ द्वारे घातले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

(ख्) कोणत्याही वाजवी वेळी, [१][ आणि त्याला योग्य वाटेल असे कोणतेही साहाय्य मिळाल्यास त्यानिशी कोणत्याही कोळसा खाणीत प्रवेश करून झडती घेऊ शकेल ] आणि ज्याच्याकडे तेथील हुकूमत असल्याचे आढळून येईल त्या कोणालाही आपणांस आवश्यक वाटतील असे कोळसा खाणीतील व्यक्तींच्या सेवायोजनासंबंधीचे हिशेब, पुस्तके, नोंदवह्या आणि इतर दस्तऐवज हजर करण्यास फर्मावू शकेल; ]

(ग्) पूर्वोक्तांपैकी कोणत्याही प्रयोजनाशी संबद्ध अशा कोणत्याही बाबीसंबंधात, नियोक्ता [३][ किंवा कलम १०ङ खाली ज्याच्याकडून कोणतीही रक्कम वसूल करावयाची आहे असा कोणताही कंत्राटदार ], त्याचा अभिकर्ता किंवा नोकर किंवा कोळसा खाणीचा [४] * * * हुकूमतदार असल्याचे आढळून आलेली अन्य कोणतीही व्यक्ती किंवा जी व्यक्ती त्या कोळसा खाणीतील कामगार आहे किंवा होती असे समजण्यास निरीक्षकाला वाजवी कारण असेल अशी कोणतीही व्यक्ती यांची तपासणी करू शकेल ;

[३][(घ्) कोळसा खाणीसंबंधात ठेवण्यात आलेले कोणतेही हिशेब, पुस्तके, नोंदवह्या किंवा अन्य दस्तऐवज यांच्या नकला काढू शकेल किंवा त्यांतून उतारे घेऊ शकेल आणि नियोक्ता किंवा कंत्राटदार याने या अधिनियमाखाली एखादा गुन्हा केलेला आहे असे मानण्यास स्वत:ला कारण असेल तेव्हा, त्या गुन्ह्यासंबंधात आपणांस संबद्ध वाटतील असे हिशेब, पुस्तके, नोंदवह्या किंवा अन्य दस्तऐवज किंवा त्यांचे काही भाग, त्याला योग्य वाटेल अशा साहाय्यानिशी सक्तीने ताब्यात घेऊ शकेल ;

(ङ्) अशा कोणत्याही योजनेद्वारे ज्यांसंबंधी तरतूद करण्यात येईल अशा अन्य शक्तींचा वापर करू शकेल.]

[३][(२क) पोटकलम (२) च्या खंड (क्) किंवा खंड (ख्) खाली कोणतीही माहिती सादर करण्यास किंवा कोणताही दस्तऐवज हजर करण्यास फर्मावण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती, 'भारतीय दंड संहिता, १८६०' (१८६० चा ४५)-कलम १७५ च्या अर्थानुसार, तसे करण्यास विधित: बद्ध असल्याचे मानण्यात येईल.

(२ख) 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५) याचे उपबंध, उक्त संहितेच्या कलम ९८ खाली काढण्यात आलेल्या वॉरंटाच्या प्राधिकारान्वये केलेल्या झडतीला किंवा अभिग्रहणाला जसे लागू होतात तसे ते, होईल तेथवर, पोटकलम (२) खालील कोणत्याही झडतीला किंवा अभिग्रहणाला लागू होतील. ]

(१) प्रत्येक निरीक्षक हा 'भारतीय दंड संहिता, १८६०' (१८६० चा ४५)-कलम २१ च्या अर्थानुसार लोक सेवक असल्याचे मानण्यात येईल.

[५][ नियोक्त्याकडून येणे असलेल्या पैशांची वसुली करण्याची पद्धत. ]

[५][ १०क. या अधिनियमाखाली तयार करण्यात आलेल्या कोणत्याहो योजनेखाली कोणत्याही अंशदानाच्या किंवा बोनसच्या संबंधात नियोक्त्याकडून येणे असलेली कोणतीही रक्कम [१][ अथवा कलम ३घच्या पोटकलम (१) किंवा पोटकलम (३) अन्वये खातेबदल कराव्या लागणाऱ्या कोणत्याही संचित रकमा किंवा कलम १०च अन्वये वसूल करावयाची अशी कोणतीही नुकसानी किंवा अशा कोणत्याही योजनेच्या प्रशासनासंबंधात या अधिनियमाखाली नियोक्त्याने द्यावयाचा कोणताही खर्च ] केंद्र शासनाला जमीन-महसुलाच्या थकबाकीच्याच पद्धतीने वसूल करता येईल. ]

[६][ विवक्षित प्रकरणीं नियोक्त्याची निश्चिती करणे. ]

[६][ १०ख. (१) जेव्हा नियोक्ता म्हणजे एखादी पेढी किंवा अन्य व्यक्तिसंघ असेल तेव्हा, ते सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही भागीदार सदस्य, अथवा जेव्हा नियोक्ता म्हणजे एखादी कंपनी असेल तेव्हा, तिचे सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही संचालक यांच्या विरुद्ध, नियोक्ता ज्याबद्दल शिक्षापात्र असतो अशा कोणत्याही गुन्ह्याबद्दलच्या अधिनियमाखाली खटला भरता येईल आणि त्यांना शिक्षा करता येईल :

परंतु, जर एखादी पेढी, व्यक्तिसंघ किंवा कंपनी यांनी —

(क्) पेढीच्या बाबतीत, आपल्यापैकी एखाद्या भागीदाराला,

(ख्) व्यक्तिसंघाच्या बाबतीत, आपल्यापैकी एखाद्या सदस्याला,

(ग्) कंपनीच्या बाबतीत, आपल्यापैकी एखाद्या संचालकाला

---

१. १९५१ चा अधिनियम २१—कलम २ द्वारे घातले.

२. १९६५ चा अधिनियम ४५—कलम ८ द्वारे "कोणत्याही कोळसा खाणीमध्ये किंवा तिच्या कार्यालयामध्ये प्रवेश करू शकेल" या मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता—कलम ८ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

४. कित्ता—कलम ८ द्वारे "किंवा तिच्या कार्यालयाचा" हे शब्द गाळले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

५. कित्ता—कलम ९ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

६. कित्ता—कलम १० द्वारे घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

या अधिनियमाच्या किंवा त्याखाली तयार केलेल्या कोणत्याही योजनेच्या प्रयोजनार्थ नियोक्त्याची जबाबदारी पत्करण्यासाठी आपण नामनिर्देशित केले आहे अशी आयुक्त, कोळसा खाणी भविष्य निधि किंवा या संबंधात केंद्र शासनाने विनिर्दिष्ट केलेला कोणताही अधिकारी याला लेखी नोटीस दिलेली असेल आणि जेथे या अधिनियमाचा विस्तार आहे अशा कोणत्याही ठिकाणी प्रत्येक बाबतीत तो रहिवासी असेल आणि प्रत्येक बाबतीत अशी पेढी, संघ किंवा कंपनी यांच्या व्यवस्थापनाचा प्रभार प्रत्यक्षात त्याच्याकडे असेल किंवा तीमध्ये त्याचे सर्वात जास्त शेअर्स असतील तर, प्रकरणपरत्वे, असा भागीदार, सदस्य किंवा संचालक हा जोवर तेथील रहिवासी असण्याचे आणि पूर्वोक्ताप्रमाणे प्रभारी असण्याचे किंवा सर्वाधिक शेअर्स धारण करण्याचे चालू राहील तोवर, तो या अधिनियमाच्या किंवा त्याखाली तयार केलेल्या कोणत्याही योजनेच्या प्रयोजनार्थ नियोक्ता असल्याचे मानले जाईल—मात्र आयुक्त, कोळसा खाणी भविष्य निधि किंवा केंद्र शासनाने या संबंधात विनिर्दिष्ट केलेला कोणताही अधिकारी यांना त्याचे नामनिर्देशन रद्द करणारी अथवा तो भागीदार, सदस्य किंवा संचालक असण्याचे बंद झाले आहे असे निवेदन करणारी अशी लेखी नोटीस मिळालेली असेल तर गोष्ट अलाहिदा.

(२) जर नियोक्ता म्हणजे एखादे शासन किंवा कोणतेही स्थानिक प्राधिकरण असेल तर, कोळसा खाणीचा कारभार चालवण्यासाठी अशा शासनाने किंवा, प्रकरणपरत्वे, स्थानिक प्राधिकरणाने प्राधिकृत केलेले सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही अधिकारी किंवा व्यक्ती हे, त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा संविदेत विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, त्या कोळसा खाणीच्या संबंधात नियोक्ते किंवा नियोक्ता असल्याचे मानले जाईल आणि नियोक्ता ज्याबद्दल शिक्षापात्र असतो अशा कोणत्याही गुन्ह्याबद्दल या अधिनियमाखाली त्यांच्याविरुद्ध खटला भरता येईल आणि त्यांना शिक्षा करता येईल.]

[१][१०ग. (१) केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे निदेशित करू शकेल की, या अधिनियमाखाली किंवा त्याअन्वये तयार करण्यात आलेल्या कोणत्याही योजनेखाली त्याला वापरता-येण्यासारखी कोणतीही शक्ती, अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या अशा काही शर्ती असल्यास त्यांच्या अधीनतेने, आयुक्त, कोळसा खाणी भविष्य निधि, किंवा केंद्र शासनाने याबाबत प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी यांना वापरता येण्यासारखी असेल. [१][शक्तीचे प्रत्यायोजन.]

(२) या अधिनियमाखालील किंवा त्याअन्वये तयार करण्यात आलेल्या योजनेखालील मंडळाच्या ज्या शक्ती व जी कार्ये या अधिनियमाखाली तयार करण्यात आलेल्या कोणत्याही योजनेचे कार्यक्षमरीत्या प्रशासन करण्यासाठी मंडळाला आवश्यक वाटतील त्या शक्ती व ती कार्ये मंडळाला, ते विनिर्दिष्ट करील अशा काही शर्ती व मर्यादा असल्यास त्यांच्या या अधीनतेने, आपला अध्यक्ष किंवा आयुक्त, कोळसा खाणी भविष्य निधि किंवा मंडळाचा अन्य कोणताही अधिकारी यांच्याकडे प्रत्यायोजित करता येतील.]

[१][१०घ. (१) अंशदान हे नियोक्त्याला (यात यापुढे 'नियोक्त्याचे अंशदान' म्हणून निर्दिष्ट केलेले) आणि कामगाराला (यात यापुढे 'कामगाराचे अंशदान' म्हणून निर्दिष्ट केलेले) कोळसा खाणी भविष्य निधि योजनेमध्ये विनिर्दिष्ट केले असेल अशा दराने द्यावे लागेल आणि नियोक्ता नियोक्त्याचे अंशदान व तसेच कामगाराचे अंशदान देईल—मग त्याने कोणत्याही कामगाराकडून अंशदानातील कामगाराचा हिस्सा वसूल केलेला असो वा नसो. [१][नियोक्त्यांनी अंशदान करणे आणि त्याची सदस्यांकडून वसुली करणे.]

(२) एखाद्या सदस्याच्या वतीने नियोक्त्याने दिलेली कोणतीही अंशदानाची रक्कम, त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात किंवा संविदेत काहीही विरुद्ध असले तरी, सदस्याच्या वेतना-मधून वजा करून वसूल करता येईल, अन्य प्रकारे नाही.

(३) कोळसा खाणी भविष्य निधि योजनेमध्ये अन्यथा उपबंधित केले असेल तेवढे सोडून एरव्ही, ज्याच्या संबंधात अंशदान प्रदेय असेल त्या कालावधीबाबत जे वेतन देण्यात येते असे वेतन सोडून अन्य कोणत्याही वेतनामधून पोटकलम (२) खालील वजात करण्यात येणार नाही.

(४) विरुद्ध संविदा असली तरीही, नियोक्ता नियोक्त्याचे अंशदान किंवा कलम १०क मध्ये निर्देशित केलेला खर्च सदस्याच्या वेतनामधून वजा करण्यास अथवा असे अंशदान किंवा खर्च सदस्याकडून अन्यथा वसूल करण्यास हक्कदार असणार नाही.

[१][१०ङ. (१) कंत्राटदाराने किंवा त्याच्या मार्फत नेमलेल्या कामगाराच्या संबंधात नियोक्त्याने दिलेली किंवा द्यावयाची [२][अंशदानाची रक्कम (म्हणजे 'कोळसा खाणी भविष्य निधि योजने' अनुसार नियोक्त्याचे अंशदान व तसेच कामगाराचे अंशदान आणि 'विमा योजने'नुसार नियोक्त्याचे अंशदान)] आणि कलम १०क मध्ये निर्देशिलेला कोणताही खर्च आणि अशा कोणत्याही कामगाराच्या संबंधात एखाद्या कोळसा खाणी बोनस योजनेअन्वये दिलेला किंवा द्यावयाचा बोनस अशा नियोक्त्याला कंत्राटदारा-कडून, एखाद्या कंत्राटान्वये त्या कंत्राटदाराला द्यावयाच्या रकमेतून वजा करून किंवा कंत्राटदाराकडून येणे असलेले ऋण म्हणून वसूल करता येईल. [१][नियोक्ते आणि कंत्राटदार यांनी पैशांची वसूली करणे.]

---

१. १९६५ चा अधिनियम ४५–कलम १० द्वारे घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

२. १९७६ चा अधिनियम ९९–कलम १३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

(२) ज्या कंत्राटदाराकडून पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या रकमा त्याने किंवा त्याच्यामार्फत नेमलेल्या कोणत्याही कामगाराच्या संबंधात वसूल करण्यात येतील त्याला, कोळसा खाणी भविष्य निधि योजनेमध्ये अन्यथा उपबंधित केले असेल तेवढे सोडून एरव्ही, अशा कोणत्याही योजनेखालील कामगाराचे अंशदान कामगाराला द्यावयाच्या वेतनातून वजात करून वसूल करता येईल--मात्र शर्त अशी की, कामगाराचे अंशदान ज्याच्याशी संबंधित आहे त्या कालावधीबाबत जे जे प्रदेय असेल अशा वेतनाहून अन्य कोणत्याही वेतनातून अशी कोणतीही वजात केली जाणार नाही.

(३) कोणतीही विरुद्ध संविदा असली तरी, कोणीही कंत्राटदार पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेले नियोक्त्याचे अंशदान किंवा खर्च किंवा बोनस त्याने किंवा त्याच्यामार्फत नेमलेल्या कामगाराला द्यावयाच्या रकमेमधून वजा करण्यास अथवा असे अंशदान किंवा खर्च किंवा बोनस अशा कामगाराकडून अन्यथा वसूल करण्यास हक्कदार असणार नाही.]

[३][ नुकसानी वसूल करण्याची शक्ती.

[३][**१०च.** जर या अधिनियमाखाली तयार करण्यात आलेल्या एखाद्या योजनेअन्वये आपणांकडून प्रदेय असलेले एखादे अंशदान किंवा बोनस किंवा कोणताही खर्च देण्यात एखाद्या नियोक्त्याने कसूर केली, अथवा ज्या व्यक्तीने कलम ३घ च्या उपबंधांनुसार भविष्य निधीतील संचित रकमांचा खातेबदल करणे आवश्यक असते तिने अशा संचित रकमांचा खातेबदल करण्यात कसूर केली तर, केंद्र शासनाला अशा नियोक्त्याकडून किंवा, प्रकरणपरत्वे, व्यक्तीकडून थकबाकीच्या रकमेच्या पंचवीस टक्क्यांहून अधिक नाही इतपत जी रक्कम नुकसानीदाखल लादणे त्याला योग्य वाटेल अशी नुकसानीची रक्कम वसूल करता येईल. ]

अंशदाने आणि बोनस यांच्या प्रदानास इतर ऋणांपेक्षा पूर्वता.

**११.** या अधिनियमान्वये तयार करण्यात आलेल्या योजनेखालील एखादे अंशदान किंवा बोनस यांच्या बाबतीतील देय रक्कम किंवा अशा योजनेच्या प्रशासनासंबंधात येणारा खर्च, जेथे त्याबद्दलचे दायित्व हे दायी असलेल्या व्यक्ती दिवाळखोर म्हणून अभिनिर्णीत केल्या जाण्यापूर्वी अथवा जी कंपनी समापित करण्यासाठी आदेश देण्यात आलेला आहे तिच्या बाबतीत अशा आदेशाच्या दिनांकापूर्वी प्रोद्भूत झाले असेल त्या बाबतीत, 'इलाखा शहर दिवाळखोरी अधिनियम, १९०९' (१९०९ चा ३)-कलम ४९ खाली, किंवा 'प्रांतीय दिवाळखोरी अधिनियम, १९२०' (१९२० चा ५)-कलम ६१ खाली किंवा 'भारतीय कंपनी अधिनियम, १९१३' [२](१९१३ चा ७)--कलम २३० खाली दिवाळखोरांच्या संपत्तीचे किंवा, प्रकरणपरत्वे, समापनावस्थेतील कंपनीच्या मत्तेचे वितरण करताना जी ऋणे इतर सर्व ऋणांच्या आधी चुकती करावी लागतात त्यांमध्ये समाविष्ट असल्याचे मानण्यात येईल.

[१][ सद्भावपूर्वक केलेल्या कृतींना संरक्षण.]

[१][**११क.** या अधिनियमाखाली किंवा त्याअन्वये तयार केलेल्या कोणत्याही योजनेखाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबाबत कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.]

[४][ अडचणी दूर करण्याची शक्ती.]

[४][**११ख.** या अधिनियमाच्या किंवा त्याखाली तयार केलेल्या कोणत्याही योजनेच्या उपबंधांची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, **शासकीय राजपत्रात** प्रकाशित केलेल्या आदेशाद्वारे केंद्र शासन ती अडचण दूर करण्यासाठी त्याला आवश्यक किंवा समयोचित वाटेल त्याप्रमाणे या अधिनियमाच्या प्रयोजनांशी विसंगत नसलेला असा उपबंध करू शकेल किंवा तसा निदेश देऊ शकेल.]

[५][ सूट देण्याची शक्ती.]

[५][**११ग.** (१) नियोक्त्याने तशी विनंती केली असता, जर कोणत्याही कोळसा खाणीच्या कामगारांना कोणतेही स्वतंत्र अंशदान न देता किंवा विम्याचा हप्ता न भरता आयुर्विम्याच्या स्वरूपाचे लाभ मिळत आहेत--मग ते भविष्य निधीतील त्यांच्या ठेवींशी संलग्न असोत वा नसोत--आणि असे लाभ अशा कामगारांना विमा योजनेखाली अनुज्ञेय असलेल्या लाभांपेक्षा अधिक अनुकूल आहेत याबद्दल केंद्र शासनाची खात्री झाली तर, केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, व अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, कोणत्याही कोळसा खाणीला विमा योजनेच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही उपबंधांच्या प्रवर्तनातून सूट देऊ शकेल.

(२) कोणत्याही कोळसा खाणीमध्ये कामावर नेमलेल्या व विमा योजनेखाली येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तिवर्गाला अनुज्ञेय असलेले आयुर्विम्याच्या स्वरूपाचे लाभ विमा योजनेखाली पुरवण्यात येणाऱ्या लाभांपेक्षा अधिक अनुकूल असतील तर, पोटकलम (१) च्या उपबंधांस बाध न येता, विमा योजनेमध्ये, अशा व्यक्तीला किंवा व्यक्तिवर्गाला योजनेच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही उपबंधांच्या प्रवर्तनातून सूट देण्याचा उपबंध करता येईल.

---

१. १९५० चा अधिनियम ८०-कलम ५ द्वारे घातले.

२. आता 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा एक) याचे संबद्ध उपबंध पहा.

३. १९६५ चा अधिनियम ४५-कलम १० द्वारे घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

४. कित्ता--कलम ११ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

५. १९७६ चा अधिनियम ९९-कलम १४ द्वारे घातले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

(३) कोणत्याही कोळसा खाणीमध्ये कामावर नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तिवर्गाच्या संबंधात या कलमाखाली विमा योजनेच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही उपबंधांच्या प्रवर्तनापासून सूट देण्यात आली असेल (मग अशी सूट अशी व्यक्ती किंवा व्यक्तिवर्ग ज्या कोळसा खाणीमध्ये कामावर नेमलेला असेल त्या कोळसा खाणीला म्हणून देण्यात आलेली असो किंवा त्या व्यक्तीला किंवा व्यक्तिवर्गाला म्हणून देण्यात आलेली असो) अशा बाबतीत, अशा कोळसा खाणीच्या संबंधातील नियोक्त्याला,——

(क्) अशी कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तिवर्ग ज्यास हक्कदार असेल असे आयुर्विम्याच्या स्वरूपाचे लाभ किंवा कोणताही विमा निधी यांच्या संबंधात, केंद्र शासन निदेशित करील त्याप्रमाणे तसे हिशेब ठेवावे लागतील, तशी प्रतिवेदने सादर करावी लागतील, तशी गुंतवणूक करावी लागेल, निरीक्षणासाठी तशा सोयी उपलब्ध करून द्याव्या लागतील आणि तसा निरीक्षण खर्च द्यावा लागेल ;

(ख्) सूट देण्यात आल्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वी अशी कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तिवर्ग आयुर्विम्याच्या स्वरूपाच्या ज्या लाभांस हक्कदार होता त्या लाभांचे एकूण परिमाण सूट मिळाल्यानंतर कोणत्याही वेळी केंद्र शासनाच्या परवानगीवाचून कमी करता येणार नाही ; आणि

(ग्) अशी कोणतीही व्यक्ती आपली नोकरी सोडून देऊन इतर कोणत्याही कोळसा खाणी—मध्ये पुन्हा नोकरी धरील त्या बाबतीत, त्या व्यक्तीने सोडून दिलेल्या कोळसा खाणीच्या विमा निधीमध्ये त्या व्यक्तीच्या जमाखाती संचित झालेल्या रकमा ती व्यक्ती जेथे नव्याने कामावर नेमण्यात आली असेल त्या कोळसा खाणीच्या विमा निधीमध्ये किंवा, प्रकरणपरत्वे, ठेव-संलग्न विमा निधीमध्ये त्या व्यक्तीच्या जमाखात्याकडे केंद्र शासन या बाबतीत विनिर्दिष्ट करील अशा मुदतीच्या आत बदली कराव्या लागतील.

**स्पष्टीकरण.——**या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, "विमा निधि" याचा अर्थ, नियोक्त्याने कामगारांना आयुर्विम्याच्या स्वरूपाचे लाभ उपलब्ध करून देण्यासाठी, कामगारांकडून त्याबाबतीत कोणत्याही स्वतंत्र अंशदानाचे किंवा हप्त्याचे प्रदान न स्वीकारता स्थापन केलेला कोणताही निधी असा आहे——मग तो भविष्य निधीमधील त्यांच्या ठेवींशी संलग्न असो वा नसो.

(४) नियोक्ता,——

(क्) पोटकलम (१) खाली सूट देण्यात आली असेल त्या बाबतीत, त्या पोटकलमाखाली घालण्यात आलेल्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचे किंवा पोटकलम (३) च्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधांचे अनुपालन करण्यास चुकला तर;

(ख्) पोटकलम (२) खाली सूट देण्यात आली असेल त्या बाबतीत, पोटकलम (३) च्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधांचे अनुपालन करण्यास चुकला तर,

या कलमाखाली कोणतीही सूट देणारे प्राधिकरण लेखी आदेशाद्वारे ती सूट रद्द करू शकेल.

(५) पोटकलम (१) खाली किंवा पोटकलम (२) खाली देण्यात आलेली कोणतीही सूट रद्द करण्यात आली असेल त्या बाबतीत, अशी सूट ज्याला ज्याला लागू होती असा प्रत्येक कामगार जेथे कामावर नेमलेला असेल त्या कोळसा खाणीच्या विमा निधीमध्ये त्याच्या जमाखाती संचित झालेल्या रकमा विमा योजनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत आणि अशा रीतीने विमा निधीमधील त्याच्या जमाखात्याकडे बदली करण्यात येतील.]

[१][**११घ.** 'आयुर्विमा महामंडळ अधिनियम, १९५६' यामध्ये या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी, हे उपबंध परिणामक होतील.] [१][**१९५६ चा अधिनियम ३१ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अधिनियम परिणामक असणे.**]

**१२.** (१) '**कोळसा खाणी भविष्य निधि आणि बोनस योजना अध्यादेश, १९४८**' हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. **१९४८ चा अध्यादेश ७ याचे निरसन.**

(२) असे कोणतेही निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे किंवा त्याखाली प्रदान झालेली कोणतीही शक्ती वापरून केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कारवाई या अधिनियमाचा प्रारंभ जणू काही २३ एप्रिल, १९४८ रोजी झाला असावा त्याप्रमाणे या अधिनियमान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून केलेली आहे असे मानण्यात येईल.

---

१. १९७६ अधिनियम ९९-कलम १४ द्वारे घातले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

## पहिली अनुसूची

(कलम ३ पहा)

### कोळसा खाणी भविष्य निधि योजनेमध्ये उपबंधित करावयाच्या बाबी

१. ज्यांना निधीचे सदस्य व्हावे लागेल असे कामगार किंवा कामगारवर्ग, निधीमध्ये द्यावयाची अंशदाने आणि ज्या शर्तींअन्वये कामगाराला निधीचा सदस्य होण्यापासून किंवा त्यामध्ये अंशदान देण्यापासून सूट देता येईल त्या शर्ती.

[१][२. नियोक्त्यांनी स्वत: आणि [२][जे कामगार असतील (मग ते नियोक्त्याने प्रत्यक्षपणे नेमलेले असोत वा कंत्राटदाराने किंवा त्याच्या मार्फत नेमलेले असोत) त्यांनी] किंवा त्यांच्या वतीने अंशदान देणे, अशा प्रदानाचा दर, वेळ व रीत आणि ज्या रीतीने अशी अंशदाने वसूल करता येतील ती रीत.]

[३][२क. कंत्राटदारांनी किंवा त्यांच्या मार्फत नेमलेल्या कामगारांकडून अशा कंत्राटदारांना कामगारांची अंशदाने कशा रीतीने वसूल करता येतील.]

३. निधीच्या प्रशासनाचा खर्च भागवण्यासाठी आवश्यक मानल्या जातील अशा रकमा नियोक्त्याने देणे आणि ज्या दराने व ज्या रीतीने [१][तो भरणा करावा लागेल] तो दर व ती रीत.

[४][४. मंडळाला साहाय्य करण्यासाठी एखादी समिती घटित करणे.]

[४][५. विभागीय आणि इतर कार्यालये उघडणे.]

६. ज्या पद्धतीने हिशेब ठेवावे लागतील ती पद्धत, निधीच्या मालकीच्या पैशांची गुंतवणूक करणे, अंदाजपत्रक तयार करणे, लेखापरीक्षा व केंद्र शासनाला अहवाल सादर करणे.

७. ज्या शर्तींवर निधीमधून पैसे काढायला परवानगी देता येईल आणि कोणतीही वजात किंवा समपहरण करता येईल त्या शर्ती [५][,अशी वजात आणि समपहरण यांची कमाल रक्कम आणि अशा वजा केलेल्या किंवा समपहृत रकमांचा विनियोग].

८. सदस्यांना द्यावयाच्या व्याजाचा दर केंद्र शासनाने विश्वस्तमंडळाशी विचारविनिमय करून निश्चित करणे.

९. मागवण्यात येईल तेव्हा कामगाराला स्वत: आणि स्वत:चे कुटुंब यांबद्दलचा तपशील ज्या नमुन्यात सादर करावा लागेल तो नमुना.

१०. एखाद्या सदस्याच्या मृत्यूनंतर त्याच्या खाती जमा असलेली रक्कम स्वीकारण्यासाठी एखाद्या व्यक्तीचे नामनिर्देशन करणे आणि असे नामनिर्देशन रद्द करणे किंवा बदलणे.

११. नियोक्त्याने [६][किंवा कंत्राटदाराने] ठेवावयाच्या नोंदवह्या व अभिलेख आणि त्यांनी सादर करावयाची प्रतिवेदने.

१२. एखाद्या कामगाराची ओळख पटवण्याच्या प्रयोजनार्थ योजलेले ओळखपत्र, टोकन किंवा तबकडी यांचा नमुना किंवा रचनाकृती आणि ते देणे, ते सांभाळून ठेवणे आणि ते बदलून देणे.

१३. या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी आकारावयाची फी.

[७][१३क. कोणत्याही विद्यमान भविष्य निधीमधील संचित रकमा कलम ३घ खाली या निधीमध्ये जशा रीतीने बदली करण्यात येतील ती रीत, आणि अशा भविष्य निधीचे प्रशासन करणारी व्यक्ती बदली करील अशा कोणत्याही मत्तेचे मूल्यांकन कसे करावयाचे ती पद्धत.

१४. कोळसा खाणी भविष्य निधि योजनेमध्ये ज्यासाठी उपबंध करावयाचा अशी बाब अथवा ती योजना कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक किंवा योग्य असेल अशी अन्य कोणतीही बाब.]

---

१. १९५१ चा अधिनियम २१–कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (भूतलक्षी प्रभावासह).
२. १९६५ चा अधिनियम ४५–कलम १२ द्वारे "कामगारांनी" याऐवजी घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).
३. कित्ता—कलम १२ द्वारे घातले. (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).
४. कित्ता—कलम १२ द्वारे पूर्वीच्या बाबीऐवजी घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).
५. कित्ता—कलम १२ द्वारे काही शब्दांऐवजी घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).
६. कित्ता—कलम १२ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).
७. कित्ता—कलम १२ द्वारे बाब क्रमांक १४ ऐवजी घातले (१ एप्रिल १९६६ रोजी व तेव्हापासून).

## [१][ दुसरी अनुसूची

(कलम ३ ङ पहा)

### कोळसा खाणी कुटुंब पेन्शन योजनेमध्ये उपबंधित करावयाच्या बाबी

१. कोणते कामगार किंवा कामगारवर्ग यांना 'कोळसा खाणी कुटुंब पेन्शन योजना' लागू होईल आणि ज्यांना ही योजना लागू नाही अशा कामगारांना त्या योजनेत सहभागी होण्याबद्दलचा विकल्पाधिकार किती मुदतीच्या आत बजावावा लागेल.

२. कलम ३ङ (२) च्या उपबंधांच्या अधीनतेने, नियोक्ता आणि कामगार यांच्या अंशदानांपैकी किती अंश कुटुंब पेन्शन निधीमध्ये जमा करता येईल आणि तो कशा रीतीने जमा करता येईल.]

३. कुटुंब पेन्शन निधीमध्ये केंद्र शासनाने अंशदान करणे आणि असे अंशदान कशा रीतीने करावयाचे.

४. कुटुंब पेन्शन निधीचे हिशेब कशा रीतीने ठेवले जातील ते आणि केंद्र शासनाकडे असलेले कुटुंब पेन्शन निधीचे पैसे द. सा. द. शे. साडेपाच या दराहून कमी असणार नाही अशा व्याज दराने गुंतवणे.

५. मागवण्यात येईल तेव्हा तेव्हा, कामगाराला स्वतः आणि स्वतःचे कुटुंब यांबद्दलचा तपशील कोणत्या नमुन्यात सादर करावा लागेल.

६. कामगाराला त्याच्या मृत्यूनंतर मिळावयाची विम्याची रक्कम स्वीकारण्यासाठी एखाद्या व्यक्तीचे नामनिर्देशन करणे व असे नामनिर्देशन रद्द करणे किंवा त्यात बदल करणे.

७. कामगारांच्या संबंधात ठेवावयाच्या नोंदवह्या व अभिलेख, कोणताही कामगार किंवा त्याचा नामनिर्देशिती किंवा कुटुंब पेन्शन स्वीकारण्यास हक्कदार असलेला त्याचा कुटुंबीय यांची ओळख पटवण्याच्या प्रयोजनार्थ योजलेले कोणतेही ओळखपत्र, टोकन किंवा तबकडी यांचा नमुना किंवा रचनाकृती.

८. कुटुंब पेन्शन आणि विम्याची रक्कम यांच्या मानश्रेणी.

९. कुटुंब पेन्शनच्या संवितरणाची पद्धत आणि या प्रयोजनार्थ विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा संवितरण अभिकरणांबरोबर करावयाची व्यवस्था.

१०. कोळसा खाणी कुटुंब पेन्शन योजनेच्या प्रशासनासाठी आलेला खर्च केंद्र शासन मंडळाला कशा रीतीने देईल.

११. कोळसा खाणी कुटुंब पेन्शन योजनेमध्ये ज्या बाबीसाठी उपबंध करावयाचा असतो अथवा कोळसा खाणी कुटुंब पेन्शन योजना कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक किंवा योग्य असेल अशी अन्य कोणतीही बाब.]

## [२][ तिसरी अनुसूची

(कलम ३छ पहा)

### कोळसा खाणी ठेव-संलग्न विमायोजनेमध्ये उपबंधित करावयाच्या बाबी

१. विमा योजनेमध्ये ज्यांचा अंतर्भाव होईल ते कामगार किंवा तो कामगारवर्ग.

२. विमा निधीचे हिशेब कशा रीतीने ठेवण्यात येतील ते व केंद्र शासन लेखी आदेशाद्वारे गुंतवणुकीचे जे स्वरूप ठरवून देईल त्यानुसार विमा निधीच्या पैशांची गुंतवणूक.

३. मागवण्यात येईल तेव्हा तेव्हा, कामगाराला तो स्वतः व त्याच्या कुटुंबातील व्यक्ती यांबद्दलचा तपशील कोणत्या नमुन्यात सादर करावा लागेल.

४. कामगाराला त्याच्या मृत्यूनंतर मिळावयाची विम्याची रक्कम स्वीकारण्यासाठी एखाद्या व्यक्तीचे नामनिदशन करणे व असे नामनिर्देशन रद्द करणे किंवा त्यात बदल करणे.

५. कामगारांच्या संबंधात ठेवावयाच्या नोंदवह्या व अभिलेख; कोणताही कामगार किंवा त्याचा नामनिर्देशिती किंवा विम्याची रक्कम स्वीकारण्यास हक्कदार असलेला त्याचा कुटुंबीय यांची ओळख पटविण्याच्या प्रयोजनार्थ योजलेले कोणतेही ओळखपत्र, टोकन किंवा तबकडी यांचा नमुना किंवा रचनाकृती.

---

१. १९७१ चा अधिनियम १६-कलम ११ द्वारे घातले (१३ फेब्रुवारी, १९७१ रोजी व तेव्हापासून).

२. १९७६ चा अधिनियम ९९-कलम १५ द्वारे घातले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

६. विम्याच्या रकमेचे प्रमाण—ते संबंधित कामगाराच्या मृत्यूच्या लगतपूर्वीच्या तीन वर्षांच्या कालावधीमध्ये निधीमधील त्याच्या खात्यातील सरासरी शिलकीपेक्षा कमी असणार नाही किंवा दहा हजार रुपयांपेक्षा अधिक असणार नाही.

७. कामगार हा योजनेखालील लाभांस पात्र व्हावा यासाठी निधीमध्ये कायम ठेवावी लागणारी किमान सरासरी शिल्लक.

८. कामगाराच्या नामनिर्देशितीला किंवा त्याच्या कुटुंबातील व्यक्तीला योजनेखाली देय असलेली रक्कम कोणत्या रीतीने द्यावयाची—'बँकव्यवसायी कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९७०' (१९७० चा ५) याच्या पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही नवीन समनुरूप बँकेमध्ये अशा नामनिर्देशितीच्या किंवा कुटुंबीय व्यक्तीच्या नावावर बचत बँक खात्यामधील ठेवीच्या स्वरूपात ठेवण्याखेरीज अन्य रीतीने ती रक्कम देता येणार नाही असा उपबंध यामध्ये समाविष्ट आहे.

९. विमा योजनेमध्ये ज्याबाबीसाठी उपबंध करावयाचा असतो किंवा ती योजना कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक किंवा योग्य असेल अशी अन्य कोणतीही बाब.]

## [४][चौथी अनुसूची]

(कलम ५ पहा)

### कोळसा खाणी बोनस योजनेमध्ये उपबंधित करावयाच्या बाबी

१. कोणत्याही कालावधीमध्ये [१][कामगारांच्या] उपस्थितीवर अवलंबून असलेला बोनस देणे.

२. बोनस घ्यायला पात्र ठरतील असे कामगार किंवा कामगारवर्ग आणि पात्रतेच्या शर्ती.

३. कामगाराला बोनस कोणत्या दराने देण्यात येईल आणि बोनस कशा रीतीने परिगणित करून ठरवला जाईल.

४. कोणत्या परिस्थितीत एखाद्या कामगाराला बोनस मिळण्यापासून पूर्णतः किंवा अंशतः वंचित करण्यात येईल.

५. बोनस देण्यासाठी नियोक्त्याला कोणत्या प्रमाणात रकमा वेगळ्या काढून ठेवाव्या लागतील, आणि तो देण्याची वेळ व पद्धत.

६. नियोक्त्याने [२][किंवा कंत्राटदाराने] ठेवावयाच्या नोंदवह्या व अभिलेख आणि त्यांनी सादर करावयाची प्रतिवेदने.

[३][६क. बोनस ज्या तिमाहीशी संबंधित आहे त्या तिमाहीच्या अखेरीपासून सहा महिने इतक्या कालावधीपर्यंत द्यावयाची राहिलेली किंवा विनामागणी पडून राहिलेली बोनसची रक्कम नियोक्त्याने या निधीमध्ये किंवा केंद्र शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या अन्य कोणत्याही निधीमध्ये बदली करणे आणि याप्रमाणे खातेबदल केलेल्या रकमेइतक्या मर्यादेपर्यंत नियोक्त्याचे त्याच्या कामगारांप्रत असलेले दायित्व नष्ट करणे.

७. कोळसा खाणी बोनस योजनेमध्ये ज्याबाबींसाठी उपबंध करावयाचा असतो अथवा ती योजना कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक किंवा योग्य असेल अशी अन्य कोणतीही बाब.]

---

१. १९५० चा अधिनियम ८०-कलम ६ द्वारे 'कोळसा खाणीमधील कामगार' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

२. १९६५ चा अधिनियम ४५-कलम १३ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता—कलम १३ द्वारे बाब क्रमांक ७ ऐवजी घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

४. १९७१ चा अधिनियम १६-कलम ११ द्वारे मूळ अनुसूचीला "तिसरी अनुसूची" असा नवीन क्रमांक दिला होता. आता १९७६ चा अधिनियम ९९-कलम १५ द्वारे "चौथी अनुसूची" म्हणून नवीन क्रमांक दिला (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

# THE COAL MINES PROVIDENT FUND AND MISCELLANEOUS PROVISIONS ACT, 1948

# कोळसा खाणी भविष्य निधि व संकीर्ण उपबंध अधिनियम, १९४८

## इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| adit | आरोक | [ S.2(b)(vi) ] |
| aerial rope-ways | अधांतरी रज्जुमार्ग | [ S.2(b)(v) ] |
| ancillary | साहाय्यभूत | [ S.2(b)(xiii) ] |
| borings and boreholes | पोखरून काढलेले कपळे आणि विवरे | [ S.2(b)(l) ] |
| Coal Mines Bonus Scheme | कोळसा खाणी बोनस योजना | [ S.5(1) ] |
| Coal Mines Family Pension Scheme | कोळसा खाणी कुटुंब पेन्शन योजना | [ S.3E(1) ] |
| Coal Mines Provident Fund Scheme | कोळसा खाणी भविष्य निधि योजना | [ S.3(1) ] |
| contribution | अंशदान | [ S.2(c) ] |
| conveyors | वहनसाधने | [ S.2(v) ] |
| damages | नुकसानी | [ S.10F ] |
| disc | तबकडी | [ First Sch.-12 ] |
| employee | १. कामगार | [ S.2(d) ] |
| | २. कर्मचारी | [ S.5C(5) ] |
| employee's contribution | कामगाराचे अंशदान | [ S.10D(1) ] |
| employer | नियोक्ता | [ S.2(e) ] |
| employer's contribution | नियोक्त्याचे अंशदान | [ S.10D(1) ] |
| Family Pension Fund | कुटुंब पेन्शन निधि | [ S.2(ee) ] |
| fine | नजराणा | [ S.2(e) ] |
| identity card | ओळखपत्र | [ First Sch.-12 ] |
| levels and inclined planes | समतल आणि तिरपे बोगदे | [ S.2(b)(iii) ] |
| lignite | लिग्नाईट | [ S.2(aa) ] |
| liquidator | समापक | [ S.2(e) ] |
| managing agent | व्यवस्थापन एजंट | [ S.2(ff) ] |
| occupier | कार्यचालक | [ S.2(e) ] |
| planes | तिरपे बोगदे | [ S.2(b)(vi) ] |
| receiver | प्रापक | [ S.2(e) ] |
| retaining allowance | आरक्षण भत्ता | [ S. 3G.(2)-expl.(c) ] |
| royalty | स्वामित्वधन | [ S.2(e) ] |
| scales | मानश्रेणी | [ Second Sch.-8 ] |
| shaft | कूपक | [ S.2(b)(ii) ] |
| sidings | कडरूळ | [ S.2(b)(vi) ] |
| superjacent ground | वरजमीन | [ S.2(b)(iv) ] |
| token | टोकन | [ First Sch.-12 ] |
| transfer of accounts | खातेबदल | [ S.3D m.n. ] |

# कोळसा खाणी भविष्य निधि व संकीर्ण उपबंध अधिनियम, १९४८

## THE COAL MINES PROVIDENT FUND AND MISCELLANEOUS PROVISIONS ACT, 1948

### मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अंशदान | contribution | [ S.2(c) ] |
| अधांतरी रज्जुमार्ग | aerial rope-ways | [ S.2(b)(v) ] |
| आरक्षण भत्ता | retaining allowance | [ S.3G(2)-expl.(c) ] |
| आरोक | adit | [ S.2(b)(vi) ] |
| ओळखपत्र | identity card | [ First Sch.-12 ] |
| कडरूळ | sidings | [ S.2(b)(vi) ] |
| कर्मचारी | employee | [ S.2(d) ] |
| कामगार | employee | [ S.5C(5) ] |
| कामगाराचे अंशदान | employee's contribution | [ S.10D(1) ] |
| कार्यचालक | occupier | [ S.2(e) ] |
| कुटुंब पेन्शन निधि | Family Pension Fund | [ S.2(ee) ] |
| कूपक | shaft | [ S.2(b)(ii) ] |
| कोळसा खाणी कुटुंब पेन्शन योजना | Coal Mines Family Pension Scheme | [ S.3E(1) ] |
| कोळसा खाणी बोनस योजना | Coal Mines Bonus Scheme | [ S.5(1) ] |
| कोळसा खाणी भविष्य निधि योजना | Coal Mines Provident Fund Scheme | [ S.3(1) ] |
| खातेबदल | transfer of accounts | [ S.3D m.n. ] |
| टोकन | token | [ First Sch.-12 ] |
| तबकडी | disc | [ First Sch.-12 ] |
| तिरपे बोगदे | planes | [ S.2(b)(vi) ] |
| नजराणा | fine | [ S.2(e) ] |
| नियोक्ता | employer | [ S.2(e) ] |
| नियोक्त्याचे अंशदान | employer's contribution | [ S.10D(1) ] |
| नुकसानी | damages | [ S.10F ] |
| पोखरून काढलेले कपळे आणि बिवरे | borings and boreholes | [ S.2(b)(i) ] |
| प्रापक | receiver | [ S.2(e) ] |
| मानश्रेणी | scales | [ Second Sch.-8 ] |
| लिग्नाईट | lignite | [ S.2(aa) ] |
| वरजमीन | superjacent ground | [ S.2(b)(iv) ] |
| वहनसाधने | conveyors | [ S.2(v) ] |
| व्यवस्थापन एजंट | managing agent | [ S.2(ff) ] |
| समतल आणि तिरपे बोगदे | levels and inclined planes | [ S.2(b)(iii) ] |
| समापक | liquidator | [ S.2(e) ] |
| साहाय्यभूत | ancillary | [ S.2(b)(xiii) ] |
| स्वामित्वधन | royalty | [ S.2(e) ] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई